**महिला व बाल कल्याण विभाग,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे**

**जाहिर प्रसिध्दी क्र.1/2022** **जाक्र. 138 दिनांक 19/09/2022**

---

**विषय :- "स्वस्थ बालक स्पर्धा" बाबत प्रसिध्दी करणे.**

**केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत जिल्हयात 5 वा राष्ट्रीय पोषण महिना सप्टेंबर-2022 साजरा करण्यात येत आहे.या वर्षी सदर उपक्रमामध्ये "स्वस्थ बालक स्पर्धा"चा देखील समावेश करण्यात आलेला आहे.**

**त्यास अनुसरुन जिल्हयातील अंगणवाडी स्तरावर व प्रकल्पस्तरावर "स्वस्थ बालक स्पर्धा" राष्ट्रीय पोषण महिना सप्टेंबर-2022 यामध्ये आयोजित करण्यात येत असून तदनंतर तर तिमाहीला सदर स्पर्धेचे आयोजन करावयाचे आहे.**

**अंगणवाडी स्तरावर अंगणवाडीतील नोंदीत लाभार्थी व अनोंदीत लाभार्थी यांचेकरिता सदर स्पर्धा आहे.स्पर्धा दोन वयोगटाकरिता आयोजित करावयाची आहे.प्राथमिक लाभार्थी - 6 महिने ते 3 वर्षे व 3 वर्षे ते 5 वर्षे तसेच व्दितीय लाभार्थी- काळजीवाहक (पालक,कुटुंबातील इतर सदस्य,नजीक वास्तव्य करणारे कुटुंब स्नेही)या दोन वयोगटाकरिता स्पर्धेचे आयोजन अंगणवाडी स्तरावर व प्रकल्प स्तरावर करण्यात येणार आहे.अंगणवाडी स्तरावर स्पर्धेतून प्रथम दोन बालकांची सुदृढ गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. याकरिता 50 गुणाचे निकष खालीलप्रमाणे ठेवण्यात आलेले आहे.**

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1 | मासिक वाढ संनियंत्रण | 5 |
| 2 | बालकांची वैयक्तिक स्वच्छता (स्वच्छ हात, नखे, हेअर कट, हात स्वच्छ धुणे, अतिसार मुक्त बालक) | 10 |
| 3 | पोषण विषयक स्थिती- सातत्याने सर्वसाधारण वयोगट अथवा कमी वजनाच्या बालकातून सर्वसाधारण गटात समावेश | 10 |
| 4 अ | गरम ताजा आहाराची उपलब्धता व ३ ते ५ वयोगटातील बालकांची अंगणवाडीतील उपस्थिती | 10 |
| 4 ब | घरी घेऊन जाण्याचा शिधा (THR)- ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके | |
| 5 | नियमित लसीकरण सेवा | 10 |
| 6 | जंतनाशक औषध | 5 |
| | एकुण | 50 |

**दिनांक 21 सप्टेंबर 2022 रोजी अंगणवाडीतील नोंदीत लाभार्थ्यांसाठी व दिनांक 22 सप्टेंबर 2022 रोजी अंगणवाडी अनोंदींत लाभार्थ्यांसाठी "स्वस्थ बालक स्पर्धेचे" आयोजन करण्यात येणार आहे.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या अंगणवाडी केंद्रात किंवा पंचायत समिती मधील बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधण्यात यावा.**

जिल्हा कार्यक्रम अधिकारी
(महिला व बाल विकास)
जिल्हा परिषद पुणे

Scanned with CamSc